THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

'' प्रेस नोट '' **दि. १७/०९/२०२५**

गुन्हे शाखा, ठाणे शहर चे मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाची कामगिरी

'' १४ वर्षांपुर्वी केलेल्या गंभीर खुनाच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपीतास सुरत गुजरात मधुन केले जेरबंद ''

अंबरनाथ येथील श्री. अरविंद शिवलिंग वाळेकर रा. खुटवली, शिवलगनगर, अंबरनाथ (प) याचे तक्रारी वरून शिवाजीनगर पोलीस स्टेशन, अंबरनाथ (पुर्व), ठाणे शहर येथे गुरनं. १४७/२०११ भारतीय दंड संहिता कलम ३०२, ३०७, ३२६,२०१, १२०(ब) सह आर्म ॲक्ट कलम ३, २५ सह मपोका कलम ३७(१),१३५ प्रमाणे दि. २४/११/२०११ रोजी ००:३० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दिनांक २३/११/२०११ रोजी रात्रौ सुमारे ०८:३० वाजेच्या दरम्यान फिर्यादी अरविंद शिवलिंग वाळेकर वय-५१ रा. खुटवली गांव शिवलिंगनगर, अंबरनाथ,पुर्व जि. ठाणे हे शिवसेना शाखा, अंबरनाथ पुर्व येथे आले असता तेथे त्यांचा अंगरक्षक खाजगी व ड्रायव्हर शाखेच्या बाहेर थांबले.पक्षा संदर्भात चर्चा सुरू असतांना दोन इसम शाखे मध्ये आले व त्यांनी रिव्हॉल्व्हर मधुन फायरींग केली. तेव्हा फिर्यादीचा अंगरक्षक शाम सुंदर यादव यास गोळी लागल्याने तो मयत झाला. त्यानंतर फिर्यादी याचा दुसरा अंगरक्षक राकेश यादव याने त्याचे जवळील लायसन्स धारी रिव्हॉल्व्हरने फिर्यादी यांचेवर फायरींग करणारा आरोपी याचेवर फायरींग केल्याने सदर आरोपी शिवसेना शाखेच्या बाजुला पायरीजवळ खाली पडला. सदर गुन्हयात १) बबुसिंग उर्फ नंदलाल शहा २) ब्रिजेश हर्ष बहादुर सिंग ३) प्रदिप जावरेकर ४) राजेश सिंह उर्फ गोरखनाथ सिंह या आरोपींना अटक करण्यात आलेली होती. तसेच आरोपीत ५) मनिष कुमार उर्फ बबलु मदनलाल झा/शर्मा हा फिर्यादी यांचे अंगरक्षक कडुन स्व:संरक्षणार्थ झालेल्या गोळीबारात मयत झाला होता. परंतु सदर गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी नामे **भैय्याजी उर्फ राजेश रामशिरोमणी शुक्ला, वय ५१ वर्षे, हा अटक चुकविण्यासाठी लपुन राहत होता.** खुना सारख्या गंभीर गुन्हया मधिल नमुद पाहिजे आरोपी नामे भैय्याजी उर्फ राजेश रामशिरोमणी शुक्ला वय- ५१ वर्षे हा सुमारे १४ वर्षापासून पोलीसांना गुंगारा देवून वेगवेगळया ठिकाणी आपले अस्तित्व लपवून राहत होता. सदर गुन्हयाचा मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाकडून समांतर तपास चालु असतांना पोहवा/दादासाहेब पाटील यांना सदर आरोपीताविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची माहिती काढून वेगवेगळया राज्यातून मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेषण करून सदर आरोपी हा पलसाना, सुरत, गुजरात येथे असलेबाबत तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदार यांचेकडून माहिती प्राप्त झाली होती. त्याप्रमाणे मा. वरिष्ठांची परवानगी घेवून पोलीस पथक गुजरात येथे रवाना केले होते.

त्याप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहरचे पोलीस पथकाने नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपीत नामे **भैय्याजी उर्फ राजेश रामशिरोमणी शुक्ला, वय ५१ वर्षे, मुळगांव- सुकुलपूर जि. सुलतानपुर, राज्य उत्तरप्रदेश सध्या राह. रूम नं.३३३, गल्ली नं. ७, राजमंदीर रेसिडेन्सी तांतिथैय्या, कडोदर, ता. पलसाना, जिल्हा-सुरत राज्य गुजरात** यास दिनांक १६/०९/२०२५ रोजी १५:३५ वाजता पलसाना चौक, पलसाना, जिल्हा सुरत, गुजरात येथुन स्थानिक पोलीसांचे मदतीने ताब्यात घेण्यात आला. इसम नामे राजेश रामशिरोमणी शुक्ला याचा वरील नमुद गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्याची वैदयकीय तपासणी करून त्यास पुढील कायदेशीर कार्यवाहीकारीता शिवाजीनगर पोलीस स्टेशन, अंबरनाथ (पुर्व), ठाणे शहर येथे हजर केले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विनय घोरपडे (शोध-२) यांच्या अधिपत्याखाली मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयकुमार देशमुख यांच्या सुचना व मार्गदर्शनाने पोउपनि/ सुरेश माळोदे, पोहवा/दादासाहेब पाटील, पोना/ दिनकर सांवत, पोना/ अंकुश शिंदे, व पोशि/मयुर शिरसाट या पथकाने केली आहे.